# कर्मवीर अण्णांचा आदर्श तरुणांनी डोळ्यांसमोर ठेवावा

## इंद्रजीत देशमुख

केसरी वृत्तसेवा

**कुंडल** : १३५ वर्षांपूर्वी जन्म घेतलेल्या पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून युवकांनी आपल्या जीवनात पुढे जावे. कर्मवीर अण्णांचे चरित्र तरुणांना आत्मविश्वास, सहयोग, श्रमप्रतिष्ठा, स्त्रीसन्मान, निःस्वार्थी सेवा, तत्त्वनिष्ठा यांची शिकवण देईल. दुसऱ्याचे जीवन समृद्ध करता करता स्वतःचे जीवन कसे समृद्ध करावे, हे तरुणांनी कर्मवीर अण्णांच्या चरित्रातून शिकावे, असे आवाहन इंद्रजीत देशमुख यांनी केले.

रामानंदनगर येथील रयत संकुलामध्ये पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त आयोजित सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य महेंद्र लाड, जे. के. जाधव, प्र. प्राचार्य डॉ. टी. एस. भोसले, उपप्राचार्य काकासाहेब भोसले, कार्याध्यक्ष एस. बी. पाचोरे, मुख्याध्यापक एच. एस. बागल, मुख्याध्यापिका ए. एस. भोसले




रामानंदनगर : पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित सोहळ्यात उपस्थित मान्यवर.

आदी मान्यवर उपस्थित होते.

इंद्रजीत देशमुख म्हणाले, विद्यार्थी दशेत विद्यार्थ्यांनी नकारात्मक गोष्टींना मागे सारून आदर्श व्यक्तींची चरित्रे वाचावीत. मी कोण आहे आणि कशासाठी जन्माला आलो आहे, असा प्रश्न स्वतःला विचारावा. आपण निवडलेला जगण्याचा मार्ग कोणता आहे, आपले विचार काय आहेत आणि आपण समाजाला काय देणार आहोत, याचा विचार तरुणांनी करावा. मोबाईल आणि इंटरनेटच्या चक्रव्यूहात गुरफटलेल्या तरुणांना महापुरुषांची चरित्रेच दीपस्तंभाप्रमाणे दिशादर्शक ठरणार आहेत. त्याग, संवेदनशीलता, आत्मविश्वास, तत्त्वनिष्ठा, चारित्र्यसंपन्न शिक्षक यांचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे कर्मवीर अण्णा होय. कर्मवीर अण्णा हेच आजच्या तरुणांसाठी खरे आयडॉल आहेत.

अध्यक्षीय मनोगतात महेंद्र लाड म्हणाले, कर्मवीर अण्णांना आपल्या जीवनाचा खरा अर्थ कळाला होता. दुसऱ्यांचे दुःख दूर करण्यामध्ये त्यांनी आपले सुख मानले. बहुजन समाजाचे दुःख दूर करायचे असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही, हे ओळखून शिक्षणाच्या प्रचार आणि प्रसारासाठी त्यांनी आपले सारे आयुष्य खर्च केले. ग्रामीण भागामध्ये उभ्या केलेल्या शाळांमधून आज अनेक विद्यार्थी घडत आहेत. कर्मवीर अण्णांचे आदर्शवत जीवन आजही डोळ्यासमोर उभा राहते.

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, स्वामी रामानंद विद्यालय व ज्युनिअर कॉलेज आणि सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील कन्या विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्वागत व प्रास्ताविक प्र. प्राचार्य डॉ. टी. एस. भोसले यांनी केले. आभार एम. एस. मोरे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. अश्विनी तातुगडे व डॉ. तेजस चव्हाण यांनी केले.

# 'पुणे-बंगळुरू हायवेसाठी

## आंदोलन उभे

केसरी वृत्तसेवा

**सांगली** : पुणे-बंगळुरू

# कर्मवीर अण्णा हेच तरुणांसाठी आयडॉल

## इंद्रजीत देशमुख

। ललकार वृत्त ।

पलूस दि. २४ (वार्ताहर) - '१३५ वर्षांपूर्वी जन्म घेतलेल्या पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून युवकांनी आपल्या जीवनात पुढे जावे. कर्मवीर अण्णांचे चरित्र तरुणांना आत्मविश्वास, सहयोग, श्रमप्रतिष्ठा, स्त्रीसन्मान, निस्वार्थी सेवा, तत्त्वनिष्ठा यांची शिकवण देईल. दुसऱ्याचे जीवन समृद्ध करता करता स्वत:चे जीवन कसे समृद्ध करावे, हे तरुणांनी कर्मवीर अण्णांच्या चरित्रातून शिकावे.' असे मत इंद्रजीत देशमुख यांनी मांडले.




रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित सोहळयात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य महेंद्र लाड, जे. के. जाधव, प्र. प्राचार्य डॉ. टी. एस. भोसले, उपप्राचार्य काकासाहेब भोसले, कार्याध्यक्ष एस. बी. पाचोरे, मुख्याध्यापक एच. एस. बागल, मुख्याध्यापिका ए. एस. भोसले, अरुण सावंत, जयसिंग नावडकर, संजय पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, स्वामी रामानंद विद्यालय व ज्युनिअर कॉलेज आणि सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील कन्या विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी इंद्रजीत देशमुख पुढे म्हणाले, 'विद्यार्थी दशेत विद्यार्थ्यांनी नकारात्मक गोष्टींना मागे सारून आदर्श व्यक्तींची चरित्रे वाचावीत. मी कोण आहे आणि कशासाठी जन्माला आलो आहे, असा प्रश्न स्वत:ला विचारावा. आपण निवडलेला जगण्याचा मार्ग कोणता आहे, आपले विचार काय आहेत आणि आपण समाजाला काय देणार आहोत, याचा विचार तरुणांनी करावा. मोबाईल आणि इंटरनेटच्या चक्रव्यूहात गुरफटलेल्या तरुणांना महापुरुषांची चरित्रेच दिपस्तंभाप्रमाणे दिशादर्शक ठरणार आहेत. त्याग, संवेदनशीलता, आत्मविश्वास, तत्त्वनिष्ठा, चारित्र्यसंपन्न शिक्षक यांचे मूर्तिमंद उदाहरण म्हणजे कर्मवीर अण्णा होय. कर्मवीर अण्णा हेच आजच्या तरुणांसाठी खरे आयडॉल आहेत.'

अध्यक्षीय मनोगतात महेंद्र लाड म्हणाले, 'कर्मवीर अण्णांना आपल्या जीवनाचा खरा अर्थ कळाला होता. दुसऱ्यांचे दु:ख दूर करण्यामध्ये त्यांनी आपले सुख मानले. बहुजन समाजाचे दु:ख दूर करायचे असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही, हे ओळखून शिक्षणाच्या प्रचार आणि प्रसारासाठी त्यांनी आपले सारे आयुष्य खर्च केले. ग्रामीण भागामध्ये उभ्या केलेल्या शैक्षणिक शाळांमधून आज अनेक विद्यार्थी घडत आहेत. कर्मवीर अण्णांचे आदर्शवत जीवन आजही डोळ्यासमोर उभा राहते.'

यावेळी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्र. प्राचार्य डॉ. टी. एस. भोसले यांनी केले. आभार एम. एस. मोरे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. अश्विनी तातुगडे व डॉ. तेजस चव्हाण यांनी केले. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक-सेवकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# कर्मवीर अण्णा हेच तरुणांसाठी आयडॉल : इंद्रजीत देशमुख

## रामानंदनगर महाविद्यालयात कर्मवीर जयंती सोहळा

**पलूस : हॅलो प्रभात**
**(संदीप नाझरे) :**

'१३५ वर्षांपूर्वी जन्म घेतलेल्या पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून युवकांनी आपल्या जीवनात पुढे जावे. कर्मवीर अण्णांचे चरित्र तरुणांना आत्मविश्वास, सहयोग, श्रमप्रतिष्ठा, स्त्रीसन्मान, निस्वार्थी सेवा, तत्त्वनिष्ठा यांची शिकवण देईल. दुसऱ्याचे जीवन समृद्ध करता करता स्वत:चे जीवन कसे समृद्ध करावे, हे तरुणांनी कर्मवीर अण्णांच्या चरित्रातून शिकावे.' असे मत इंद्रजीत देशमुख यांनी मांडले. रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य महेंद्र लाड, जे. के. जाधव, प्र. प्राचार्य डॉ. टी. एस. भोसले, उपप्राचार्य काकासाहेब भोसले, कार्याध्यक्ष एस. बी. पाचोरे, मुख्याध्यापक एच. एस. बागल, मुख्याध्यापिका ए. एस. भोसले, अरुण सावंत, जयसिंग नावडकर, संजय पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, स्वामी रामानंद विद्यालय व ज्युनिअर कॉलेज आणि सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील कन्या विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.




यावेळी इंद्रजीत देशमुख पुढे म्हणाले, 'विद्यार्थी दशेत विद्यार्थ्यांनी नकारात्मक गोष्टींना मागे सारून आदर्श व्यक्तींची चरित्रे वाचावीत. मी कोण आहे आणि कशासाठी जन्माला आलो आहे, असा प्रश्न स्वत:ला विचारावा. आपण निवडलेला जगण्याचा मार्ग कोणता आहे, आपले विचार काय आहेत आणि आपण समाजाला काय देणार आहोत, याचा विचार तरुणांनी करावा. मोबाईल आणि इंटरनेटच्या चक्रव्यूहात गुरफटलेल्या तरुणांना महापुरुषांची चरित्रेच दिपस्तंभाप्रमाणे दिशादर्शक ठरणार आहेत. त्याग, संवेदनशीलता, आत्मविश्वास, तत्त्वनिष्ठा, चारित्र्यसंपन्न शिक्षक यांचे मूर्तिमंद उदाहरण म्हणजे कर्मवीर अण्णा होय. कर्मवीर अण्णा हेच आजच्या तरुणांसाठी खरे आयडॉल आहेत.' अध्यक्षीय मनोगतात महेंद्र लाड म्हणाले, 'कर्मवीर अण्णांना आपल्या जीवनाचा खरा अर्थ कळाला होता. दुसऱ्यांचे दु:ख दूर करण्यामध्ये त्यांनी आपले सुख मानले. बहुजन समाजाचे दु:ख दूर करायचे असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही, हे ओळखून शिक्षणाच्या प्रचार आणि प्रसारासाठी त्यांनी आपले सारे आयुष्य खर्च केले. ग्रामीण भागामध्ये उभ्या केलेल्या शैक्षणिक शाळांमधून आज अनेक विद्यार्थी घडत आहेत. कर्मवीर अण्णांचे आदर्शवत जीवन आजही डोळ्यासमोर उभा राहते.'

यावेळी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्र. प्राचार्य डॉ. टी. एस. भोसले यांनी केले. आभार एम. एस. मोरे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. अश्विनी तातुगडे व डॉ. तेजस चव्हाण यांनी केले. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक-सेवकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# कर्मवीर अण्णांचा आदर्श तरुणांनी डोळ्यांसमोर ठेवावा

## इंद्रजीत देशमुख

केसरी वृत्तसेवा

**कुंडल :** १३५ वर्षांपूर्वी जन्म घेतलेल्या पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून युवकांनी आपल्या जीवनात पुढे जावे. कर्मवीर अण्णांचे चरित्र तरुणांना आत्मविश्वास, सहयोग, श्रमप्रतिष्ठा, स्त्रीसन्मान, नि:स्वार्थी सेवा, तत्त्वनिष्ठा यांची शिकवण देईल. दुसऱ्याचे जीवन समृद्ध करता करता स्वत:चे जीवन कसे समृद्ध करावे, हे तरुणांनी कर्मवीर अण्णांच्या चरित्रातून शिकावे, असे आवाहन इंद्रजीत देशमुख यांनी केले.

रामानंदनगर येथील रयत संकुलामध्ये पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त आयोजित सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य महेंद्र लाड, जे. के. जाधव, प्र. प्राचार्य डॉ. टी. एस. भोसले, उपप्राचार्य काकासाहेब भोसले, कार्याध्यक्ष एस. बी. पाचोरे, मुख्याध्यापक एच. एस. बागल, मुख्याध्यापिका ए. एस. भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.




**रामानंदनगर : पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित सोहळ्यात उपस्थित मान्यवर.**

इंद्रजीत देशमुख म्हणाले, विद्यार्थी दशेत विद्यार्थ्यांनी नकारात्मक गोष्टींना मागे सारून आदर्श व्यक्तींची चरित्रे वाचावीत. मी कोण आहे आणि कशासाठी जन्माला आलो आहे, असा प्रश्न स्वत:ला विचारावा. आपण निवडलेला जगण्याचा मार्ग कोणता आहे, आपले विचार काय आहेत आणि आपण समाजाला काय देणार आहोत, याचा विचार तरुणांनी करावा. मोबाईल आणि इंटरनेटच्या चक्रव्यूहात गुरफटलेल्या तरुणांना महापुरुषांची चरित्रेच दीपस्तंभाप्रमाणे दिशादर्शक ठरणार आहेत. त्याग, संवेदनशीलता, आत्मविश्वास, तत्त्वनिष्ठा, चारित्र्यसंपन्न शिक्षक यांचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे कर्मवीर अण्णा होय. कर्मवीर अण्णा हेच आजच्या तरुणांसाठी खरे आयडॉल आहेत.

अध्यक्षीय मनोगतात महेंद्र लाड म्हणाले, कर्मवीर अण्णांना आपल्या जीवनाचा खरा अर्थ कळाला होता. दुसऱ्यांचे दु:ख दूर करण्यामध्ये त्यांनी आपले सुख मानले. बहुजन समाजाचे दु:ख दूर करायचे असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही, हे ओळखून शिक्षणाच्या प्रचार आणि प्रसारासाठी त्यांनी आपले सारे आयुष्य खर्च केले. ग्रामीण भागामध्ये उभ्या केलेल्या शाळांमधून आज अनेक विद्यार्थी घडत आहेत. कर्मवीर अण्णांचे आदर्शवत जीवन आजही डोळ्यासमोर उभा राहते.

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, स्वामी रामानंद विद्यालय व ज्युनिअर कॉलेज आणि सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील कन्या विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्वागत व प्रास्ताविक प्र. प्राचार्य डॉ. टी. एस. भोसले यांनी केले. आभार एम. एस. मोरे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. अश्विनी तातुगडे व डॉ. तेजस चव्हाण यांनी केले.

# 'पुणे-बंगळुरू हायवेसाठी

## आंदोलन उभे

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** पुणे–बंगळुरू ग्रीनफिल्ड हायवेबाधित

# कर्मवीर अण्णा हेच तरुणांसाठी आयडॉल

## इंद्रजीत देशमुख

। ललकार वृत्त ।

पलूस दि. २४ (वार्ताहर) - '१३५ वर्षांपूर्वी जन्म घेतलेल्या पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून युवकांनी आपल्या जीवनात पुढे जावे. कर्मवीर अण्णांचे चरित्र तरुणांना आत्मविश्वास, सहयोग, श्रमप्रतिष्ठा, स्त्रीसन्मान, निस्वार्थी सेवा, तत्त्वनिष्ठा यांची शिकवण देईल. दुसऱ्याचे जीवन समृद्ध करता करता स्वत:चे जीवन कसे समृद्ध करावे, हे तरुणांनी कर्मवीर अण्णांच्या चरित्रातून शिकावे.' असे मत इंद्रजीत देशमुख यांनी मांडले.



रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित सोहळयात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य महेंद्र लाड, जे. के. जाधव, प्र. प्राचार्य डॉ. टी. एस. भोसले, उपप्राचार्य काकासाहेब भोसले, कार्याध्यक्ष एस. बी. पाचोरे, मुख्याध्यापक एच. एस. बागल, मुख्याध्यापिका ए. एस. भोसले, अरुण सावंत, जयसिंग नावडकर, संजय पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, स्वामी रामानंद विद्यालय व ज्युनिअर कॉलेज आणि सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील कन्या विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी इंद्रजीत देशमुख पुढे म्हणाले, 'विद्यार्थी दशेत विद्यार्थ्यांनी नकारात्मक गोष्टींना मागे सारून आदर्श व्यक्तींची चरित्रे वाचावीत. मी कोण आहे आणि कशासाठी जन्माला आलो आहे, असा प्रश्न स्वत:ला विचारावा. आपण निवडलेला जगण्याचा मार्ग कोणता आहे, आपले विचार काय आहेत आणि आपण समाजाला काय देणार आहोत, याचा विचार तरुणांनी करावा. मोबाईल आणि इंटरनेटच्या चक्रव्यूहात गुरफटलेल्या तरुणांना महापुरुषांची चरित्रेच दिपस्तंभाप्रमाणे दिशादर्शक ठरणार आहेत. त्याग, संवेदनशीलता, आत्मविश्वास, तत्त्वनिष्ठा, चारित्र्यसंपन्न शिक्षक यांचे मूर्तिमंद उदाहरण म्हणजे कर्मवीर अण्णा होय. कर्मवीर अण्णा हेच आजच्या तरुणांसाठी खरे आयडॉल आहेत.'

अध्यक्षीय मनोगतात महेंद्र लाड म्हणाले, 'कर्मवीर अण्णांना आपल्या जीवनाचा खरा अर्थ कळाला होता. दुसऱ्यांचे दु:ख दूर करण्यामध्ये त्यांनी आपले सुख मानले. बहुजन समाजाचे दु:ख दूर करायचे असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही, हे ओळखून शिक्षणाच्या प्रचार आणि प्रसारासाठी त्यांनी आपले सारे आयुष्य खर्च केले. ग्रामीण भागामध्ये उभ्या केलेल्या शैक्षणिक शाळांमधून आज अनेक विद्यार्थी घडत आहेत. कर्मवीर अण्णांचे आदर्शवत जीवन आजही डोळ्यासमोर उभा राहते.'

यावेळी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्र. प्राचार्य डॉ. टी. एस. भोसले यांनी केले. आभार एम. एस. मोरे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. अश्विनी तातुगडे व डॉ. तेजस चव्हाण यांनी केले. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक-सेवकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# कर्मवीर अण्णा हेच तरुणांसाठी आयडॉल : इंद्रजीत देशमुख

## रामानंदनगर महाविद्यालयात कर्मवीर जयंती सोहळा

**पलूस : हॅलो प्रभात**
**(संदीप नाझरे) :**

'१३५ वर्षांपूर्वी जन्म घेतलेल्या पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून युवकांनी आपल्या जीवनात पुढे जावे. कर्मवीर अण्णांचे चरित्र तरुणांना आत्मविश्वास, सहयोग, श्रमप्रतिष्ठा, स्त्रीसन्मान, निस्वार्थी सेवा, तत्त्वनिष्ठा यांची शिकवण देईल. दुसऱ्याचे जीवन समृद्ध करता करता स्वत:चे जीवन कसे समृद्ध करावे, हे तरुणांनी कर्मवीर अण्णांच्या चरित्रातून शिकावे.' असे मत इंद्रजीत देशमुख यांनी मांडले. रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य महेंद्र लाड, जे. के. जाधव, प्र. प्राचार्य डॉ. टी. एस. भोसले, उपप्राचार्य काकासाहेब भोसले, कार्याध्यक्ष एस. बी. पाचोरे, मुख्याध्यापक एच. एस. बागल, मुख्याध्यापिका ए. एस. भोसले, अरुण सावंत, जयसिंग नावडकर, संजय पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, स्वामी रामानंद विद्यालय व ज्युनिअर कॉलेज आणि सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील कन्या विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



यावेळी इंद्रजीत देशमुख पुढे म्हणाले, 'विद्यार्थी दशेत विद्यार्थ्यांनी नकारात्मक गोष्टींना मागे सारून आदर्श व्यक्तींची चरित्रे वाचावीत. मी कोण आहे आणि कशासाठी जन्माला आलो आहे, असा प्रश्न स्वत:ला विचारावा. आपण निवडलेला जगण्याचा मार्ग कोणता आहे, आपले विचार काय आहेत आणि आपण समाजाला काय देणार आहोत, याचा विचार तरुणांनी करावा. मोबाईल आणि इंटरनेटच्या चक्रव्यूहात गुरफटलेल्या तरुणांना महापुरुषांची चरित्रेच दिपस्तंभाप्रमाणे दिशादर्शक ठरणार आहेत. त्याग, संवेदनशीलता, आत्मविश्वास, तत्त्वनिष्ठा, चारित्र्यसंपन्न शिक्षक यांचे मूर्तिमंद उदाहरण म्हणजे कर्मवीर अण्णा होय. कर्मवीर अण्णा हेच आजच्या तरुणांसाठी खरे आयडॉल आहेत.'अध्यक्षीय मनोगतात महेंद्र लाड म्हणाले, 'कर्मवीर अण्णांना आपल्या जीवनाचा खरा अर्थ कळाला होता. दुसऱ्यांचे दु:ख दूर करण्यामध्ये त्यांनी आपले सुख मानले. बहुजन समाजाचे दु:ख दूर करायचे असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही, हे ओळखून शिक्षणाच्या प्रचार आणि प्रसारासाठी त्यांनी आपले सारे आयुष्य खर्च केले. ग्रामीण भागामध्ये उभ्या केलेल्या शैक्षणिक शाळांमधून आज अनेक विद्यार्थी घडत आहेत. कर्मवीर अण्णांचे आदर्शवत जीवन आजही डोळ्यासमोर उभा राहते.'

यावेळी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्र. प्राचार्य डॉ. टी. एस. भोसले यांनी केले. आभार एम. एस. मोरे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. अश्विनी तातुगडे व डॉ. तेजस चव्हाण यांनी केले. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक-सेवकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होता.

पुढारी



रामानंदनगर : येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात बोलताना भास्कर कदम.

# एन. डी. पाटील यांच्या विचारांचा आदर्श घ्यावा

## डॉ. भास्कर कदम यांचे प्रतिपादन

**पलूस : पुढारी वृत्तसेवा**

करिअरच्या मागे धावणाऱ्या तरुणांनी आपल्या शिक्षणाचा, ज्ञानाचा उपयोग समाजासाठी व्हावा म्हणून प्रयत्न करावेत. प्रा. एन. डी. पाटील यांच्यासारख्या विचारवंतांनी आपले आयुष्य कष्टकरी-श्रमजीवी लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी खर्च केले आहे. तेव्हा त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन तरुणांनी आपल्या जीवातील काही वेळ समाजकार्यासाठी दिला पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. भास्कर कदम यांनी केले.

ते रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात बोलत होते. मराठी विभागाच्यावतीने प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. ते म्हणाले, महाराष्ट्रासह भारत देश भयंकर वर्तमानातून जात आहे. जनतेने आपल्याला कशासाठी निवडले आहे, याचा विसर नेतेमंडळींसह राज्यकर्त्यांना पडला आहे. त्यांच्या कल्पनेतील राष्ट्रामध्ये शेतकरी-कष्टकरी-श्रमजीवी लोकांचे अस्तित्वच त्यांना मान्य नाही. शासनयंत्रणेला धारेवर धरून सर्वसामान्य जनतेचे प्रश्न मांडणारा एन. डी. सरांसारखा एकही नेता आज आपल्यात नाही, ही खेदाची बाब आहे. प्राचार्य एल. डी. कदम म्हणाले, संघर्ष हेच एन. डी. पाटील सरांचे दुसरे नाव होय. सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नांसाठी तहयात शासन यंत्रणेसह त्यांनी वैचारिक व कृतिशील लढा दिला. उपप्राचार्य डॉ. काकासाहेब भोसले, उपप्राचार्य डॉ. टी. एस. भोसले उपस्थित होते.

डॉ. तेजस चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. प्रा. दिलीप कोने यांनी स्वागत, तर आभार डॉ. नितीन कुंभार यांनी मानले. प्रा. स्वाती मगदूम यांनी सूत्रसंचालन केले.

My Sangli Edition
Jul 21, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

सकाळ

# 'छत्रपती शाहू महाराजांचा विचार प्रेरणादायी'

सकाळ वृत्तसेवा

किर्लोस्करवाडी, ता. १ : छत्रपती शाहू महाराजांनी स्त्रियांविषयी केलेले कार्य आजच्या पिढीला प्रेरणादायी आहे. त्यांनी मांडलेला स्त्री-पुरुष समानता हा मानवमुक्तीचा विचार आजच्या पिढीला मार्गदर्शक आहे. शाहू महाराजांनी लागू केलेला कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा अमलात आणला. त्याचा फायदा आजच्या काळामध्ये महिलांना होत असल्याचे मत शारदाबाई पवार अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी व्यक्त केले.



किर्लोस्करवाडी : मनोगत व्यक्त करताना डॉ. भारती पाटील. व्यासपीठावर प्राचार्य एल. डी. कदम, डॉ. सचिन चव्हाण आदी.

रामानंदनगर-बुर्ली येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचा राज्यशास्त्र विभाग आणि शिवाजी विद्यापीठाचे शारदाबाई पवार अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती व स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त 'राजर्षी शाहू महाराजांचे स्त्रीविषयक विचार' या विषयावर महाविद्यालयामध्ये एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित केली होती, यावेळी त्या बोलत होत्या.

शाहू महाराजांचे विचार आजच्या पिढीला मार्गदर्शक ठरणारे आहेत, अशा पद्धतीचा मनोदय कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी अध्यक्षीय मनोगतात व्यक्त केला. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. के. बी. भोसले, डॉ. टी. एस. भोसले उपस्थित होते. डॉ. सचिन चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. विनोद वानखेडे यांनी करून दिला. डॉ. अश्विनी तातुगडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. शीतल पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी प्राध्यापक व विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Sangli, Sangli-Today
02/07/2022 Page No. 102

लोकमत

# एन. डी. पाटील हे स्वातंत्र्योत्तर काळातील लोकनायक

## एकनाथ पाटील : रामानंदनगर येथे व्याख्यान; लोककल्याणासाठी चळवळी उभ्या केल्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**दुधोंडी :** स्वातंत्र्योत्तर काळात ७५ वर्षे एन. डी. पाटील यांनी लोककल्याणासाठी आंदोलने, मोर्चे आणि चळवळी उभ्या केल्या. शेतकरी, कष्टकरी लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी एन. डी. पाटील यांनी आपले अखंड आयुष्य खर्च केले. त्यामुळेच ते खऱ्या अर्थाने स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्राच्या जीवनाला निर्णायक वळण देणारे लोकनायक ठरले, असे मत प्रा. एकनाथ पाटील यांनी व्यक्त केले.

रामानंदनगर (ता. पलूस) येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. ज्येष्ठ विचारवंत व्ही. वाय. पाटील अध्यक्षस्थानी होते.

व्ही. वाय. पाटील म्हणाले, शोषितांना शोषणाच्या विळख्यातून मोकळा करणारा विचार एन. डी. पाटील यांनी समाजाला दिला. सद्‌गुण, सद्विचार आणि सत्कार्य या त्रिसूत्रीत एन. डी. सरांचे व्यक्तित्व बांधता येईल. सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नांसाठी शासन व्यवस्थेबरोबर एनडींनी आयुष्यभर वैचारिक लढा दिला आहे.

उपप्राचार्य डॉ. काकासाहेब भोसले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. तेजस चव्हाण यांनी स्वागत केले. प्रा. स्वाती मगदूम यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. दिलीप कोने आभार मानले. कार्यक्रमाचे संयोजन प्र. प्राचार्य टी. एस. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभागाने केले.

सकाळ

# एन. डी. ज्ञान, अविचल तत्त्वनिष्ठेचे उपासक

## व्ही. वाय. पाटील ; डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात स्मृतिप्रीत्यर्थ मासिक व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

किर्लोस्करवाडी, ता. १९ : ''ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील ज्ञानाचे व अविचल तत्त्वनिष्ठेचे उपासक होते. अचाट स्मरणशक्ती व असीम धैर्याचे ते मूर्तिमंत उदाहरण होते. अन्यायाची चीड व न्यायाची चाड एन. डी. सरांच्या रोमारोमांत भिनली होती. सामान्य माणूस हा त्यांच्या आस्थेचा विषय होता. शेती, शेतकरी, उपेक्षितांच्या उन्नतीसाठी एन. डी. पाटील सर आयुष्यभर झटले,'' असे प्रतिपादन व्ही. वाय. पाटील यांनी केले.



किर्लोस्करवाडी : येथे व्याख्यानात बोलताना व्ही. वाय. पाटील.

शेतकरी, कष्टकऱ्यांचे कैवारी, कृतिशील विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दर महिन्याच्या १७ तारखेला डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात व्याख्यान होते. डॉ. एन. डी. पाटील यांच्या कार्याची विद्यार्थी-विद्यार्थिनींना ओळख व्हावी, या उद्देशाने व्याख्यान होते. उपक्रमातील हे पाचवे व्याख्यान होते.

श्री. पाटील म्हणाले, ''एन. डी. पाटील नेहमी म्हणत, आयुष्यातील काही लढाया आपण हरणार आहोत, हे माहीत असतानाही लढायच्या असतात. काही लढाया जिंकण्यापेक्षा त्या कशासाठी व कोणत्या विषयासाठी लढल्या, हे महत्त्वाचे असते.''

जे. के. जाधव अध्यक्ष होते. ते म्हणाले, ''एन. डी. पाटील यांचे सहकार क्षेत्रातील काम अद्वितीय आहे. एन. डी. पाटील यांनी हातात घेतलेल्या कामाचा शेवट केल्याशिवाय थांबले नाहीत. लोकांना अशक्य वाटणाऱ्या गोष्टी एन. डी. सरांनी जबर इच्छाशक्ती व पारदर्शक कार्यपद्धतीने साध्य केल्या. एन. डी. पाटील हयातभर शेतमाल, पाणी, शेतीच्या वीजप्रश्नांसाठी सरकारबरोबर लढले. अशिक्षितांपर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे हा त्यांचा कटाक्ष होता. 'रयत' च्या माध्यमातून ते हयातभर राबले.'' डॉ. तेजस चव्हाण यांनी स्वागत केले. प्रा. सतीश मस्के यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. स्वाती मगदूम यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. दिलीप कोने यांनी आभार मानले.

Sangli, Sangli-Today
20/08/2022 Page No. 102

# स्त्री शिक्षण आणि स्त्री उद्धाराचे अलौकिक काम करणारा राजा म्हणजे राजर्षी शाहू महाराज - प्रा डॉ भारती पाटील

**पलूस** - डॉ पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर बुर्ली राज्यशास्त्र विभाग आणि शारदाबाई पवार अध्यासन शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती व स्मृती शताब्दी वर्षानिमित्त एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री विषयक विचार या विषयावर महाविद्यालयामध्ये आयोजित केली होती.



सदर कार्यशाळेमध्ये प्रमुख पाहुण्या शारदाबाई पवार अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ भारती पाटील यांनी छत्रपती शाहू महाराजांनी केलेले स्त्रियांच्या विषयी कार्य आजच्या पिढीला प्रेरणादायी आहे त्यांनी शाहू महाराजांनी मांडलेला स्त्री पुरुष समानता हा मानव मुक्तीचा विचार आजच्या पिढीला मार्गदर्शक आहे असा आशावाद व्यक्त केला. तसेच शाहू महाराजांनी केलेला कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा अमलात आणला त्याचा फायदा आजच्या काळामध्ये महिलांना होत आहे अशा पद्धतीचे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एलडी कदम यांनी अध्यक्षीय मनोगतात शाहू महाराजांचे विचार आजच्या पिढीला मार्गदर्शक ठरणारे आहेत अशा पद्धतीचा मनोदय व्यक्त केला. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ के बी भोसले, डॉ टी एस भोसले, उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ सचिन चव्हाण यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा विनोद वानखेडे, कार्यक्रमाचे आभार डॉ शीतल पाटील यांनीमानले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ अश्विनी तातुगडे यांनी केले. कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने प्राध्यापक व विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

द यांनी जनसेवा प्रिंटर्स, नवतेज कॉम्प्लेक्स, दत्तमंदिर, देवपूर, धुळे येथे छापून **मध्यवर्ती कार्यालय** - नवतेज कॉम्प्लेक्स, द
ार.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची) **विधी सल्लागार** - ॲड.राहूल एस.भामरे (कोणताही वाद धुळे न्यायालयात)
iniknirbhid .com